ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 5 | JANUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचार व प्रसारामध्ये कॉम्रेड डी.बी.कुलकर्णी यांचे योगदान



प्रा. विधाटे गणेश शंकर
पीएच.डी. संशोधक , इतिहास , रयत शिक्षण संस्थेचे,
एस.एस.जी.एमकॉलेज,कोपरगाव.

**महत्त्वाचे शब्दः** कॉम्रेड, कम्युनिस्ट, आयटक,रेल्वे मेन्स युनियन, युगांतर.

## शोध निबंधाचा उद्देशः

1. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांच्या पूर्वचरित्राचा आढावा घेणे.
2. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांचे असहकार चळवळीतील योगदान अभ्यासणे.
3. कॉ.डी.बी.कुलकर्णी यांचे रेल्वे मेन्स युनियन कामगार संघटनेतील कार्याचा मागोवा घेणे.
4. 1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीतील कार्याचा आढावा घेणे.
5. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांचे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या प्रसारातील योगदान पाहणे.
6. 1942 ची चलेजाव चळवळ व 1948च्या कम्युनिस्ट पक्षातील कॉ. बी.टी. रणदिवे व कॉ.शामराव परुळेकर यांच्या अतिसाहसवादी धोरणासंबंधी कॉ.डी.बी.कुलकर्णी यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

## प्रास्ताविकः

अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे शेतकरी, कामगार व शेतमजुर हे मुख्य शक्तीस्रोत होते. ब्रिटिश सरकार, सावकार व नोकरशाहीच्या जुलूम अन्याय व अत्याचाराला बळी पडलेल्या कष्टकरी समाजाला बरोबर घेऊन कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स व लेनिनच्या 'साम्यवादी' तत्त्वज्ञानानुसार त्यांच्यात लढाऊ बाणा निर्माण करुन जिल्ह्यात कम्युनिस्ट पक्षाची पायाभरणी करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये कॉ.डी.बी. कुलकर्णी यांचे स्थान सर्वात वरच्या दर्जाचे आहे.अहमदनगर जिल्ह्यातील पहिला कम्युनिस्ट कार्यकर्ता होण्याचा बहुमान हा कॉ. डी.बी. कुलकर्णी यांच्याकडेच जातो.प्रस्तुत शोध निबंधात कॉ. डी.बी. कुलकर्णी यांच्या नेतृत्त्वाखाली अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाची जडणघडण कशा प्रकारे झाली याचा अभ्यास करणे हा उद्देश आहे.

## 1. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांचा पूर्ववृत्तांत :

दत्तात्रय बाबाजी कुलकर्णी यांचा जन्म 22 ऑक्टोबर 1893 रोजी अहमदनगर शहरातील सांगळे गल्लीमधील घोसपूरकरांच्या वाडयात झाला.त्यांच्या आईचे नाव यमुनाबाई होते. त्या दत्तात्रयाच्या लहाणपणीचवारल्याने त्यांचा सांभाळ विसापूरजवळच्या पिंपळगाव पिसा गावी राहणाऱ्या त्यांच्या आजीने केला. नगर तालुक्यातील घोसपुरी हे डी.बी.कलुकर्णी यांचे मूळ गाव. तेथेच गावच्या ख्रिस्ती मिशनरी शाळेत व नंतर सरकारी शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले.[1]

डी.बी. कुलकर्णी यांचे चुलत आजोबा बाळाजीपंत यांनी आपल्या हयातीत व इंग्रजी आमदनीत अनेक लांडयालबाडया करुन घोसपुरी गावातील गोरगरिबांच्या एक तृतीयांश जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या होत्या.त्यांनी गावातील जनतेवर केलेल्या जुलूम अत्याचारांमुळे सन 1876-77साली जेंव्हा अहमदनगर जिल्ह्यातील सावकारांच्या विरुध्द 'रोखे फाडीचे' बंड झाले, तेंव्हा गावातील 400 शेतकऱ्यांनी त्यांचा काटा काढण्याचा निश्चय केला.परंतु 3-4 शेतकऱ्यांनी ही कटाची बातमी बाळाजीपंत यांना सांगितली.त्यांनी आपल्या किल्लेवजा वाडयात आश्रय घेतला.शेतकऱ्यांना ही वार्ता समजताच त्यांनी वाडयाला वेढा घातला.दरवाजा फोडण्याचा तसेच वाडा जाळण्याचा शेतकऱ्यांनी अयशस्वी प्रयत्नही केला.कुटुंबातील सदस्य चोर मार्गाने बाहेर पडले.दत्तात्रयाचे वडील बाबाजी कुलकर्णी यांनी घोडयावरुन सुपे येथे जाऊन पोलिसांची मदत मागितली. परंतु तेथेही शेतकऱ्यांचा उठाव झाल्याने व त्यांनी सावकारांचे वाडे व दस्तऐवज जाळून त्यांना मारहाण केल्याने तेथील फौजदाराला त्यांच्या बरोबर येणे अशक्य झाले. तेंव्हा त्या फौजदाराने पत्र देऊन बाबाजी कुलकर्णी यांना अहमदनगरच्या पोलीस अधिक्षकाकडे पाठविले. त्यांनी 25 पोलिसांच्या ताप्यासह घोसपुरी गाठले. 40 शेतकऱ्यांना अटक करुन त्यांच्यावर खटले भरले.त्यांना 3 महिने ते 2 वर्षांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.परंतु एवढी दडपशाही होऊनही शेतकऱ्यांनी मागे न हटता सावकारांवर बहिष्काराचे अस्त्र उगारले.त्यांच्या जमिनी 10 ते15 वर्षे कोणीही कसल्या नाहीत. मात्र पुढे शेतकऱ्यांमध्ये फूट पडल्याने 1890साली बहिष्काराचा हा लढा संपला. पुढे 1899 साली बाळाजीपंत यांचे निधन झाल्याने त्यांची सर्व स्थावर इस्टेट बाबाजी कुलकर्णी यांच्याकडे आल्याने ते गावातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून ओळखले जाऊ लागले.[2]

1905साली डी.बी.कुलकर्णी यांचे पाचवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना अहमदनगरला पुढील शिक्षणासाठी सोसायटी हायस्कूलमध्ये घालण्यात आले. 1908 साली डी.बी.कुलकर्णी यांचा त्यांचे वर्गमित्र शंकर देशपांडे यांच्या बहिणीशी घोसपुरीला विवाह झाला. 1905 च्या वंगभंग चळवळीनंतर देशात राष्ट्रवादी प्रवृत्तीला उधान आले. हा काळ राष्ट्रीय चळवळीचा असल्याने डी.बी.कुलकर्णी हे लोकमान्य टिळक व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतिकार्याकडे आकर्षित झाले. डी.बी. कुलकर्णी यांनी हायस्कूलमधील इतर मुलांबरोबर क्रांतिकारी चळवळीचे काम सुरु ठेवल्याने त्यांना शाळा प्रशासनाने इतर मुलांबरोबर सोसायटी हायस्कूलमधून काढून टाकले.[3]

## 2. रेल्वे मध्ये तारमास्तर पदावर कार्यरत :

क्रांतिकारी चळवळीतील सहभागामुळे डी.बी. कुलकर्णी यांना शिक्षण सोडावे लागले.मात्र उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांच्या समोर होताच.बऱ्याच प्रयत्नानंतर 1910 साली त्यांना मुंबईला रेल्वेमध्ये तारमास्तरांची नौकरी मिळाली. रेल्वेत तारमास्तरांना इंग्रजी आद्याक्षरांनी हाक मारण्याची पध्दत असल्याने सर्वजण दत्तोपंतांना 'डी.बी. के.'असे म्हणत. पुढे त्यांचे हेच नाव रेल्वे कामगार वर्गात व कम्युनिस्ट पक्षात गाजले.इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळे रेल्वेची नौकरी करीत असतानाच त्यांनी रेल्वेच्या कायद्यांचा कसून अभ्यास सुरु केला. एखाद्या कामगारावर अन्याय झाला की डी.बी. कुलकर्णी कायद्याने कामगारांची बाजू मांडीत असत. मात्र असे करतांना ते स्वतः आपले काम चोख पार पाडीत असत. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी त्यांना वचकून असत. आपल्या कार्यकुशलतेच्या बळावर लवकरच डी.बी. कुलकर्णी यांना अहमदनगरला 1914 साली असिस्टंट स्टेशन मास्तर म्हणून बढती मिळाली. अहमदनगरला 1919 पर्यंत डी.बी.के.कार्यरत होते. 1919 साली त्यांची मध्यप्रदेशात 'टिमारनी'ला बदली झाली.[4]

## 3.1920च्या असहकार चळवळीत सहभाग :

1920 साली महात्मा गांधीजींनी ब्रिटिश सरकारविरुध्द असहकार चळवळीचे रणशिंग फुंकले. गांधीजींच्या आवाहनास प्रतिसाद देऊन डी.बी. कुलकर्णी यांनी रेल्वेतील आपल्या नौकरीवर पाणी सोडले. आपले बिऱ्हाड घोसपुरीला आणले व गावातूनच कॉंग्रेसच्या पध्दतशीर प्रचाराला सुरुवात केली. डी.बी. कुलकर्णी यांच्या बरोबर त्यांचे बंधु भैय्याजी कुलकर्णी यांनीही आपल्या तलाठयाच्या सरकारी नौकरीचा राजीनामा दिला. डी.बी.कुलकर्णी यांनी त्यांना कॉंग्रेसची दिक्षा दिली. घोसपुरीला या दोन बंधुंनी तरुण मित्र मंडळींसह कॉंग्रेस कमिटीची स्थापना केली.

अहमदनगरला बाळासाहेब देशपांडे, हरिभाऊ पटवर्धन, नानासाहेब सप्तर्षी यांच्याशी विचार विनिमय करत डी.बी. कुलकर्णी व भैय्याजी कुलकर्णी यांनी नगर जिल्ह्यात कॉंग्रेसच्या चळवळीचा प्रचार सुरु केला. गावागावातील देवळात मुक्काम करुन 'पुराण प्रवचनाला या' असे लोकांना सांगून 2 ते 3 वर्षे देवळात लोकांना पुराण प्रवचनातून महात्मा गांधीजींचे असहकाराचे तत्त्वज्ञान तसेच ब्रिटिश राजवटीची कुटिल नीती पटवून देण्याचे कार्य केले. पुढे जिल्ह्यात झालेल्या सत्याग्रह, मोर्चे, हरताळ यात लोकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. त्याचे श्रेय काही प्रमाणात डी.बी. कुलकर्णी यांच्या प्रचाराला द्यावेच लागेल.[5]

1921 साली टाटा उद्योगसमूहाने मुळशी धरण बांधण्यास काढले. कॉंग्रेस पक्षाने तेथे सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. 22 जानेवारी 1923 रोजी शंकरराव देव, कॉ. विनायकराव भुस्कुटे, सेनापती बापट यांच्यासह डी.बी. कुलकर्णी हे देखील सत्याग्रहासाठी गेले.[6] सत्याग्रह सुरु होताच सरकारने सर्व पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकले. परंतु एक दगड टाकायचा आणि स्वतःला पकडून द्यायचे हे झटपट पुढारी बनण्याचे तंत्र डी.बी.के. यांना न पटल्याने ते मुळशी सत्याग्रहात सामील झाले नाहीत. जी गोष्ट मनाला पटली नाही ती दूसरा कोणीतरी सांगतोय म्हणून डी.बी.के. यांनी कधीही अंमलात आणली नाही.संपूर्ण आयुष्य राजकारणाला समर्पित केले असताना अनेकदा प्रलोभने दाखवली गेली.मात्र त्यांनी कधीही आपल्या मूल्यांशी तडजोड केली नाही.

### 4. रेल्वे मेन्स युनियन कामगार संघटनेची स्थापनाः

महात्मा गांधीजींचा असहकाराचा लढा अयशस्वी झाल्यावर डी.बी.कुलकर्णी यांनी पुन्हा रेल्वेतील नौकरी पत्करली. आपले बंधु भैय्याजी कुलकर्णी यांनाही रेल्वेत नौकरी मिळवून दिली.ब्रिटिश राजवटीत भारतीय जनतेस वर्णभेदाची वागणूक मिळत असे. रेल्वे कामगारांवर होणारा अन्याय डी.बी. कुलकर्णी पाहत होते. तेंव्हा या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी डी.बी. के. यांनी भारतीय कामगार चळवळीचे प्रवर्तक एस.एच.झाबवाला यांची एक मोठी सभा 1926 साली मुंबई मधील कुर्ल्याला आयोजित केली. ही सभा मोठी जंगी झाली.सभेत रेल्वे कामगारांची 'रेल्वे मेन्स युनियन' ही कामगार संघटना स्थापन करण्यात आली.रेल्वे कामगारांना कॉ.के.नी.जोगळेकर या कम्युनिस्ट पुढाऱ्याचे मार्गदर्शन होऊ लागले. डी.बी. कुलकर्णी यांनी इगतपुरी ते मनमाड या रेल्वे लाईनवर प्रचार करुन रेल्व मेन्स युनियन कामगार संघटनेचा पाया मजबूत करण्याचेकार्य केले.राष्ट्रीय चळवळीतील कॉ.बाबा पुरंदरे, कॉ. जी.एच. काळे, कॉ.डी.एस. वैद्य ही कम्युनिस्ट मंडळी पुढे रेल्वे मेन्स युनियनच्या प्रसारासाठी काम करु लागली.[7]

### 5. कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यत्त्वाचा स्वीकारः

रेल्वे मेन्स युनियनमध्ये काम करीत असतांनाच कॉ.डी.बी. कुलकर्णी यांचा मुंबईमधील कम्युनिस्टांशी संबंध येऊ लागला.त्यांच्या बरोबर ते रशियातील कम्युनिस्ट क्रांती, समाजसत्तावाद, कामगार क्रांती या विषयावरील चर्चेत भाग घेऊ लागले.याच काळात मुंबईमध्ये कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांच्या नेतृत्त्वाखाली गिरणी कामगारांचा सहा महिने चाललेला संप झाला. या संपाला मार्गदर्शन करण्यासाठी लंडनहून ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाचे कॉ.ब्रॅडले, कॉ. फिलिप स्प्रॅट आणि हचिमन अशा तीन कम्युनिस्ट व्यक्ती भारतात आल्या होत्या.या तिघांशी कॉ. डी.बी. कुलकर्णींचा संबंध आला.या संप काळात ते कल्याण येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या एका सभेला गेले व तेथेच त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले.अशा प्रकारे अहमदनगर जिल्ह्यातील पहिला कम्युनिस्ट होण्याचा बहुमान कॉ. डी.बी. कुलकर्णी यांच्याकडे जातो.[8]

### 6. 1928चे झारिया येथील आयटकचे अधिवेशन व कॉ.डी.बी. कुलकर्णी :

बिहार राज्यातील झारिया हे कोळश्याच्या खाणीसाठी प्रसिध्द असलेले ठिकाण होते. तेथे 1928 साली आयटकचे अधिवेशन आयोजित करण्यात आले. अधिवेशनात कॉंगेस पुढाऱ्यांचा नेमस्तवादी गट व कम्युनिस्टांचा जहाल क्रांतिकारी गट अशी दुफळी पडली. कम्युनिस्टांच्या तत्त्वनिष्ठ धोरणामुळे दोन गटात भांडणे लागली. त्याला कंटाळून नेमस्तवादी गटाने अध्यक्षपदासाठी पंडित जवाहरलाल नेहरु यांचे नाव सुचविले.तर जहाल कम्युनिस्ट गटाने कॉ.

डी.बी. कुलकर्णी यांचे नाव सुचविले.यावेळी कॉ. डी.बी. कुलकर्णी म्हणाले, ''मी एक साधा कामगार !मला नेहरुंविरुध्द कशाला उभे करता? नेहरु आंतरराष्ट्रीय किर्तीचे पुढारी! त्यांना बिनविरोध निवडून आणूया.आमच्यात लढत बरी नव्हे.''[9] परंतु जहाल गटाने त्यांचे म्हणणे ऐकले नाही. झालेल्या मतदानात कॉ.डी.बी. कुलकर्णी फक्त 6 मतांनी हरले.पंडित नेहरु आपल्या आत्मचरित्रात या घटनेचा उल्लेख करताना म्हणतात, ''कामगार चळवळीशी दैनंदिन संबंध असलेला माणूसच या संस्थेचे अध्यक्षस्थान भूषविण्यास योग्य आहे. माझ्या विरुध्द एक कामगार उभा आहे, हे मला कळले असते तर माझे नाव मागे घेऊन आपले मत मी त्याला दिले असते.''[10]

## 7. 4 फेब्रुवारी 1930 चा रेल्वे कामगारांचा संपः

रेल्वेचे जाळे देशभर जसे पसरत जाऊ लागले तसे रेल्वेचा नफाही वाढू लागला.परंतु रेल्वेत काम करणाऱ्या कामगारांचे प्रचंड हाल हाते.त्यांना 12-12 तास काम करावे लागे.पगार अत्यंत कमी होता.रहायला घरे नव्हती. ॲंग्लो-इंडियन अधिकारी त्यांच्यावर फार अन्याय करीत असत. अशा परिस्थित कामगारांची एकजूट महत्त्वाची होती व युनियनने त्यांच्या पाठीशी राहणे आवश्यक होते. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांनी रेल्व मेन्स युनियनच्या स्थापनेत सिंहाचा वाटा उचलला.कामगारांवरील अन्यायाला सनदशीर मार्गाने वाचा फोडण्यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांची भेट घेऊन कामगारांच्या मागण्या त्यांच्यापुढे मांडण्यासाठी रेल्वे मेन्स युनियनचे पुढारी शिष्टमंडळ घेऊन गेले.त्यात कॉ. डी.बी. कुलकर्णी यांचा मोठा पुढाकार होता.पण अधिकाऱ्यांनी या शिष्टमंडळाच्या मागण्यांना धुडकावून लावले. परिणामी रेल्वे कामगारांना नाइलाजाने संपाचे हत्यार उपसावे लागले.

यावेळी देशात सविनय कायदेभंग चळवळीचे वारे वाहत होते.या चळवळी दरम्यान जर रेल्वे कामगारांचा संप झाला तर ब्रिटिशांची राज्ययंत्रणा कोसळून पडेल असा गुप्त करार रेल्वे कामगारांचे पुढारी आणि कॉंग्रेसमधील बोस-नेहरु प्रभूती तरुण पुढाऱ्यांमध्ये झाला.रेल्वे मेन्स युनियनचे पुढारी संपाच्या तयारीला लागले. रेल्वे अधिकाऱ्यांना याची वार्ता समजताच कॉ.डी.बी. कुलकर्णी यांना नोकरीवरुन कमी करण्यात आले.कॉ. डी.बी. कुलकर्णी यांनी दुसऱ्या दिवसापासून मुंबई ते दिल्ली रेल्वे लाईनवर सभा घेऊन कामगारांना संपाचे महत्त्व समजावून दिले.4 फेब्रुवारी 1930 रोजी रेल्वे कामगारांचा संप झाला.90,000 रेल्वे कामगार संपावर गेले. परंतु हा संप अल्पजीवी ठरला.ज्यांनी या संपात भागीदारी केली त्यांना ॲंग्लो-इंडियन अधिकाऱ्यांनी पुन्हा नोकरीवर घेतले नाही. त्यात कॉ.डी.बी. कुलकर्णी, कॉ.पुरंदरे,कॉ. डी.एस.वैद्य, जी.एच. काळे, झुल्मिराम चौधरी आदी पुढाऱ्यांचा समावेश होता.[11]

## 8. 1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीतील योगदान :

रेल्वे संपात नोकरी गेल्याने कॉ. डी.बी. कुलकर्णी अहमदनगरला आले.महात्मा गांधीजींच्या दांडी मोर्चाची तयारी जोरात सुरु होती. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांनी काकासाहेब चिंचोरकर, दादासाहेब चौधरी, रामभाऊ हिरे, भाई सथ्था या कॉंग्रेस पुढाऱ्यांसोबत कॉंग्रेसच्या प्रचाराला सुरुवात केली. त्यांच्या पत्नी शांताबाई, मुलांसह स्वयंसेवकांच्या प्रभातफेऱ्या काढत असत. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांनी सोसायटी शाळेच्या पटांगणावर विलायती टोप्यांची जंगी होळीकेली.शहरात त्यांनी सभा घेण्याचा धडाका लावला.त्याच्या प्रचारामुळे विद्यार्थी, कष्टकरी वर्ग मोठया संख्येने सत्याग्रहात उडी घ्यायला, तुरुंगात जायला तयार झाला.नगर शहरात अशी एक गल्ली नव्हती की जिच्यातील माणूस तुरुंगात गेला नाही.जी मंडळी या चळवळीत होती ती अभिमानाने म्हणत, ''आम्ही कॉ. डी.बी. कुलकर्णी यांच्या व्याख्यानांमुळे तयार झालो.''यातील अनेकजण पुढे कॉंग्रेसमध्ये राहिले, काही समाजावादी पक्षात गेले. पण आयुष्यभर ती माणसे चळवळीतच राहिली.[12]

प्रचार कार्याच्या सततच्या दगदगीने कॉ. डी.बी. कुलकर्णी आजारी पडले.गांधीजींच्या दांडी सत्याग्रहाबरोबर देशभर कायदेभंग चळवळीला उधाण आले. राष्ट्रीय पाठशाळेचे सेनापती दादासाहेब चौधरी यांच्याबरोबर कॉ.डी.बी. कुलकर्णी यांचे मेहुणे बाळ व कॉ. डी.बी. कुलकर्णी यांचा मुलगा केशव शिरोडयाच्या सत्याग्रहासाठी पायी जायला तयार झाले. परंतु मुले लहान असल्याने त्यांना कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात भाग घेऊ दिला नाही.[13] शांताबाई कुलकर्णी

या 1932च्या वैयक्तिक सत्याग्रहात सहभागी झाल्या.[14] त्याबद्दल त्यांना तीन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा व 20रु. दंड करण्यात आला.[15]

### 9. अहमदनगर जिल्ह्यात कम्युस्टि चळवळीचा प्रसार :

स्वातंत्र्यपूर्व काळात कॉग्रेसमध्ये अनेक विचार प्रवाह व चळवळी सामावल्या गेल्या होत्या.या विचारप्रवाहांपैकी समाजवादाचा प्रवाह सर्वात जोरकस प्रवाह होता.1934मध्ये कॉग्रेस अंतर्गत एम.आर.मसावी, जे.पी. नारायण, ना.ग. गोरे, एस.एम. जोशी, अच्युत पटवर्धन, र. के.खाडीलकर या जहालवादी तरुणांनी 'कॉग्रेस सोशॅलिस्ट पक्षाची' स्थापना केली.[16] ना.ग. गोरे, एस.एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन, र. के.खाडीलकर यांनी अहमदनगरच्या बागडे थिएटरमध्ये सभा घेतली. साम्यावादी तत्त्वज्ञानाने भारावलेल्या कॉ.डी.बी. कुलकर्णी यांनी त्यांच्याशी संपर्क साधला.कॉग्रेसमधील बाबा गोसावी, भाऊ क्षीरसागर, राम निसळ, कॉ. विनायकराव भुस्कुटे यांच्या मदतीने कॉ.डी.बी. कुलकर्णी यांनी 'तरुण मित्र मंडळ' ही संघटना स्थापन केली.ब्रिटिश सरकारने 1935 मध्ये कॉ.एस.व्ही.देशपांडे यांना अहमदनगर शहरातील भिंगारमध्ये स्थानबद्ध केले होते. कॉ. एस.व्ही. देशपांडे यांच्या मदतीने कॉ.डी.बी. कुलकर्णी हे तरुण मित्र मंडळाच्या सभासदांची मार्क्सवादी अभ्यासमंडळे घेण्याकरिता पुण्याहून कॉ.विष्णुपंत चितळे यांना बोलवत असत. पुढे या दोघांनी नगर शहरात कम्युनिस्ट पक्षाचा सेल स्थापन केला.[17] तरुण मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने कॉ. डी.बी. कुलकर्णी यांनी कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांच्या सभा नगर येथील गांधी मैदानात भरविल्या होत्या.

जनतेत कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याकरिता कॉ. एस.व्ही. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉ. डी.बी. कुलकर्णी, बाबा गोसावी, कॉ.विनायकराव भुस्कुटे यांनी 1936 साली 'युगांतर' साप्ताहिक सुरु केले.कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचे 'क्रांती' हे साप्ताहिक बंद पडल्यावर त्यांनी युगांतर या साप्ताहिकास कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत वर्तमानपत्र म्हणून मान्यता दिली. कॉ. एस.व्ही. देशपांडे यांच्या युगांतरमधील 'समाजवाद' व 'तिरंगी तात्यावाद' या दोन लेखमाला फार गाजल्या. मुंबई व सोलापूर येथील कामगार चळवळीचे वृत्त युगांतरमधून प्रसिध्द होत असे.[18]

कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत वृत्तपत्र म्हणून 'युगांतर' लोकप्रिय होत होते.सरकारने या वृत्तपत्राची मुस्कटदाबी करण्याकरिता युगांतरकडून 1 हजार रुपयांचा जामीन मागितला.पक्षाच्या हितचिंतकांकडून व पंडित जवाहरलाल नेहरुंच्या अहमदनगर जिल्ह्यातील निवडणूक सभांमधून 1 हजार रु. निधी गोळा करुन सरकारकडे जामीन म्हणून भरण्यात आला.पुढे हंगामी मंत्रीमंडळातील बॅरिस्टर जमनादास मेहता अहमदनगरला आले असता त्यांना युगांतरचा जामीन परत मिळवून दिला.

ऑगस्ट 1936 मध्ये कॉ. डी.बी. कुलकर्णी यांनी अहमदनगर शहरात काही व्यक्तींना कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत सभासद करुन घेतले.अशा प्रकारे नगर शहरात कम्युनिस्ट पक्षाची शाखा स्थापन झाली.[19] कॉ. डी.बी. कुलकर्णी यांनी कम्युनिस्ट पक्षाचे नगर शहरात बीजारोपण केले व पुढे त्या बीजारोपणाचा विस्तार होऊन त्याचे विशाल वटवृक्षात रुपांतर झालेले दिसून येते.

1936मध्ये फैजपूर येथे कॉग्रेसचे सुवर्ण महोत्सवी 50 वे अधिवेशन ग्रामीण भागात घेण्याचे ठरले.कॉग्रेसच्या व्यासपीठावरुन कामगार - शेतकऱ्यांच्या प्रश्नास चालना मिळावी याकरिता या अधिवेशनावर अहमदनगर जिल्ह्यातून शेतकऱ्यांचा पायी मोर्चा नेण्याचा निर्णय घेण्यात आला.कॉ. डी.बी. कुलकर्णी, कॉ.विनायकराव ताकटे, कॉ.विनायकराव भुस्कुटे, कॉ.बुवासाहेब नवले यांनी पुढाकार घेऊन गावोगावी प्रचार सभा घेतल्या.कॉ. लालजी पेंडसे यांच्या नेतृत्वाखाली 10 हजार शेतकऱ्यांचा 'लॉंगमार्च' फैजपूरला नेण्यात आला. या अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरु मार्चास सामोरे गेले.व त्यांनी कामगार-शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांचे निवेदन स्वीकारले.या अधिवेशनात कॉ. श्रीपाद अमृत डांगे हे जिल्ह्यातील बेलापूर भागातून कॉग्रेस कमिटीवर निवडून गेले.[20] अशा प्रकारे कॉग्रेसच्या व्यासपीठावरुन कॉ.डी.बी. कुलकर्णी, कॉ.एस.व्ही. देशपांडे, कॉ.विनायकराव ताकटे, कॉ.विनायकराव भुस्कुटे इत्यादी कम्युनिस्ट नेत्यांनी अहमदनगर जिल्ह्यातून कम्युनिस्ट पक्षाचे सहानुभूतिदार व पक्ष सभासद वाढवून कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीचा जिल्हयात मोठा प्रसार केला.

## 10. 1942 ची चलेजाव चळवळ व कॉ. डी.बी. कुलकर्णी:

कम्युनिस्ट पक्षात काम करीत असतांना कॉ.डी.बी.कुलकर्णी हे पक्षाच्या धोरणाबाबत अत्यंत चिकित्सक व शिस्तप्रिय होते. 22जून 1941 रोजी जर्मनीने रशियावर आक्रमण केले.त्यामुळे रशिया दुसऱ्या महायुध्दात ओढला गेला.कम्युनिस्ट पक्षाने जर्मनीच्या रशियावरील हल्ल्याचे मूल्यमापन 'लोकयुध्द' असे केले.इ.स. 1942 साली महात्मा गांधींनी दिलेल्या 'छोडो भारत' घोषणेने 'ऑगस्ट क्रांतीची' सुरुवात झाली. भारताचे फॅसिस्ट शक्तींपासून संरक्षण करुन स्वातंत्र्य प्राप्ती करणे हे 1942 च्या छोडो भारत चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या मते मात्र ऑगस्ट प्रस्तावात देशाचे फॅसिस्टांपासून संरक्षण करणे व ब्रिटिश राजवटीविरुध्द सविनय कायदेभंग चळवळ सुरु करणे या दोन परस्पर विरोधी बाबी अंतर्भूत करण्यात आल्या होत्या.[21] भारतीय कम्युनिस्ट पक्षाने कॉंग्रेस, मुस्लिम लीग व अन्य राजकीय पक्षांची फॅसिझम विरुध्द आघाडी उघडावी व ब्रिटिश सरकारवर दबाव आणून त्यांना राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याकरिता उद्युक्त करावे. तसेच कॉंग्रेसने असहकाराचे धोरण सोडून देण्याबाबतचा पर्याय समोर आणला.परंतु भारतीय जनतेचा ब्रिटिश राजवटी विरुध्दचा असंतोष व राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची ब्रिटिशांची अनास्था यामुळे कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणास कॉंग्रेसचा पाठिंबा मिळू शकला नाही.साहजिकच लोकयुध्दाच्या भूमिकेवरुन कम्युनिस्टांनी चलेजाव चळवळीस विरोध केला.[22] कम्युनिस्ट पक्षाचे हे धोरण मान्य नसलेल्या अनेक कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी बंड करुन तुरुंगवास पत्करला.पक्षाच्या शिस्तभंगाचा बडगाही झेलला. कॉ.एस.के.लिमये यांचा गट याच वेळी कम्युनिस्ट पक्षातून बाहेरपडला. कॉ.डी.बी. कुलकर्णी मात्र पक्षशिस्त म्हणून पक्षात राहून 'लोकयुध्दाचा' प्रचार करत होते. आपल्याला लढयात प्रत्यक्ष भाग घेता येत नाही, परंतु जे या चळवळीत भाग घेत आहेत त्यांना मदत करावी या भावनेने कॉ.डी.बी.कुलकर्णी अनेकांना मदत करीत होते. कॉ.बहादूरखान नावाचा कार्यकर्ता दौंडला ज्या चाळीत राहत होता, त्या चाळी एका बाजूला होत्या.कॉ. डी.बी. कुलकर्णी हे त्या चाळीत भूमिगत कार्यकर्त्यांना लपवून ठेवत असत. एखाद्या भूमिगत कार्यकर्त्याला दुसरीकडे जायचे असेल तर त्याचे वेषांतर करुन त्याची जायची व्यवस्था करत असत. कॉ.डी.बी. कुलकर्णी यांच्यावर पोलिसांना शंका यायचे कारण नव्हते.कारण त्यांची पक्षावरील निष्ठा सर्वांना ठाऊक होती. महत्त्वाचे म्हणजे आपण करीत असलेल्या गुप्त गोष्टींबाबत कॉ.डी.बी. कुलकर्णी घरच्यांनाही अनभिज्ञ ठेवत असत.[23]

## 11. 1948 ची भारतीय कम्युनिस्ट पक्षाची नेहरु सरकारविरुध्द अतिजहाल भूमिका व कॉ. डी.बी. कुलकर्णी :

15 ऑगस्ट 1947 रोजी देशास स्वातंत्र्य मिळाले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख कॉ.पी.सी.जोशी यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित केलेल्या मेजवानी मध्ये पक्षाच्या कॉ. बाबुराव रणदिवे व कॉ.शामराव परुळेकर या पुढाऱ्यांनी सहभाग घेतला नाही.त्यांचे असे म्हणणे होते की, 1947 साली खरे स्वातंत्र्य मुठभर भांडवलदार, जमिनदार व काळाबाजारवाल्यांना मिळाले आहे. इतके दिवस या शोषित वर्गावर गोरी नोकरशाही जुलूम करीत असे, आता काळी हुकुमशाही त्यांच्यावर राज्य करणार आहे.एक शोषकशाही नष्ट झाली.परंतु दुसरी शोषकशाही भांडवलदार-जमीनदारांच्या रुपाने अस्तित्वात होती.त्यांच्या मदतीने कामगार-शेतकऱ्यांना दडपले जाईल.[24] 'यह आजादी झूठी है, देश की जनता भुकी है' असे म्हणत त्यांनी मिळालेल्या स्वातंत्र्यास विरोध केला.[25] कॉ.डांगे मीरत कटाच्यावेळी तुरुंगात असतानाच कम्युनिस्ट पक्षात दोन गट पडले होते.एका गटाचे नेतृत्व कॉ.बाबुराव रणदिवे व कॉ.शामराव परुळेकर यांच्याकडे होते तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व कॉ. एस.व्ही.देशपांडे यांच्याकडे होते. त्यांच्यातील मतभेद मिटविण्यासाठी आलेल्या रशियन पुढाऱ्यांनी कॉ.डी.बी.कुलकर्णी यांना पाचारण केले. कम्युनिस्ट पक्ष एकसंध रहावा या करिता.कॉ. डी.बी. के.यांना दिलेला बहुमान, तसेच कॉ.डांगे व कॉ. डी.बी. के यांचे मैत्रीचे संबंध कॉ.बाबुराव रणदिवे व कॉ.शामराव परुळेकर यांना रुचले नाहीत.

1948 साली कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन कलकत्ता येथे होणार होते. या अधिवेशनसाठी अहमदनगर जिल्ह्यातून पक्षाचे प्रतिनिधी निवडण्यासाठी जिल्हा समितीची बैठक भरली.कॉ.शामराव परुळेकर हे बैठकीत मार्गदर्शन करण्यासाठी आले होते.कॉ. डी.बी.कुलकर्णी यांच्यावरील रागामुळे कॉ. शामराव परुळेकर यांनी कलकत्ता कॉंग्रेससाठी अहमदनगर जिल्ह्यातून जिल्हा प्रतिनिधी म्हणून कॉ.डी.बी.के. यांच्याऐवजी कॉ.चंद्रभान आठरे यांची निवड

केली.गटबाजीच्या राजकारणास विरोध करणारे कॉ.बी.के.या राजकारणाचा बळी ठरले. 'सुधारणावादी छापेचा शिक्का मारुन' कॉ.डी.बी.के. यांनी गप्प केले गेले.[26]

28फेब्रुवारी ते 6 मार्च 1948 रोजी कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन कलकत्ता येथे संपन्न झाले. त्यात 632 सभासदांनी भाग घेतला.अधिवेशनात पाच वर्षासाठी पॉलिट ब्यूरो व केंद्रीय समितीची निवड करण्यात आली.कॉ.बाबुराव रणदिवे यांची कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली.अधिवेशानात कॉ.बाबुराव रणदिवे यांनी कॉ.पी.सी. जोशी यांच्यावर सुधारणावादाबद्दल व उजव्या दुरुस्तीवादाबद्दल कठोर टिका केली.आपल्या राजकीय ठरावात कम्युनिस्ट पक्षाने म.गांधी व पं.नेहरु यांना भांडवलदारांचे हस्तक ठरविले.आणि माऊंटबॅटनच्या धोरणाचा त्यांनी स्वीकार केल्यामुळे त्यांना साम्राज्यवादाचे साथीदार मानले.तेलंगण, त्रावणेकोर, तेभागा येथील चळवळीचे अतिमापन करुन नव्या पॉलिट ब्युरोने आपल्या ठरावात असे मत मांडले की, मिळेल त्या मार्गाने नेहरु सरकारला विरोध करा आणि या सरकारला पदच्युत करा.कारण भांडवलदार हा प्रतिक्रांतीचा पुरस्कर्ता आहे.भारताचे स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्य नसून आजही भारत अॅग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे हस्तक राष्ट्र आहे.साम्राज्यशाही व सरंजामशाहीचे ते हितरक्षण करते.यासाठी सशस्त्र लढा, गनिमी काव्याचे युध्द, सार्वत्रिक संप, निदर्शने, मोर्चे यांचा वापर करण्यात यावा. जनतेच्या या संघर्षातून नवी व्यवस्था, नवे राज्य निर्माण होईल.[27]

भारतास स्वातंत्र्य मिळाले. आता लोकशाही क्रांती व समाजवादी क्रांती यासाठी पुढील लढाईची तयारी सुरु केली पाहिजे ही कम्युनिस्ट पक्षाची मोठी चूक होती. कारण लोकशाही क्रांतीची कार्ये अजून पूर्ण झाली नव्हती.जनता अजूनही कॉंग्रेसच्या प्रभावाखाली होती.1942 च्या आंदोलनातील भूमिकेमुळे पक्ष जनतेपासून एकाकी पडला होता. या चुकीचे परिणाम पक्षाला लवकरच भोगावे लागले. सरकारने कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली.[28] अहमदनगर जिल्ह्यातील 1200 कम्युनिस्टांना तुरुंगात टाकण्यात आले. त्यात कॉ.डी.बी.कुलकर्णी यांचाही समावेश होता. तत्पूर्वी कॉ.डी.बी.कुलकर्णी यांनी कूळ कायदा येणार म्हणून आपले छोटेसे शेत आपल्याच कुळाला देऊन टाकले.[29] 4 एप्रिल 1948 रोजी कॉ.डी.बी.कुलकर्णी यांना घोसपुरी येथे अटक करुन विसापूरच्या तुरुंगात टाकण्यात आले. तुरुंगात येताच कॉ.डी.बी.के. यांची प्रकृती बिघडली.4 मे 1948 रोजी त्यांना अर्धांगवायूचा पहिला झटका आला. तुरुंगातील कॉम्रेडसनी व भाई सथ्था यांनी आणलेल्या दबावामुळे कॉ.डी.बी.के. यांना नगरच्या सरकारी दवाखान्यात दाखल केले गेले. तेथे पोलीसांचा पहारा लावण्यात आला. त्यांच्या पत्नी शांताबाई यांनी कॉ.डी.बी.के. यांच्या सेवाशुश्रुषा व औषधोपचार याकरिता त्यांची सुटका करावी यासाठी केलेला अर्ज फेटाळण्यात आला. 9 मे रोजी कॉ.डी.बी.के. यांना दूसरा अर्धांगवायूचा झटका आला. बऱ्याच खटाटोपीनंतर कॉ.डी.बी.के. यांना एक महिन्याचा जामीन मिळाला.मात्र त्यासाठी कम्युनिस्ट चळवळीत भाग घेणार नाही, जिल्हा न्यायाधीशाच्या परवानगीशिवाय नगर सोडावयाचे नाही व 10 जून 1948 रोजी विसापूर तुरुंगात हजर व्हावयाचे अशा जाचक अटी घालण्यात आल्या.परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. 11मे 1948 रोजी दवाखान्यातच कॉ.डी.बी.के. यांचा अंत झाला.[30] सत्य अहिंसेचे पुजारी म्हणविणाऱ्या कॉंग्रेस सरकारच्या राज्यात एका वयस्कर,आदरणीय कम्युनिस्ट कामगार पुढाऱ्याला सरकारीव नोकरशाहीच्या क्रुर व बेपर्वा वृत्तीमुळे आलेले मरण निश्चितच भूषणावह नव्हते.

## समारोपः-

अहमदनगर जिल्ह्यातील जुने व अनुभवी कम्युनिस्ट पुढारी कॉम्रेड डी.बी.कुलकर्णी हे जिल्ह्यातील कम्युनिस्ट चळवळीची पायाभरणी करणारे पहिले कम्युनिस्ट म्हणून ओळखले गेले होते. भारतातील श्रमजीवी आंदोलनास जागतिक प्रतिष्ठा मिळवून देऊन त्याचा वैभवशाली पाया उभा करण्यासाठी कॉ.डी.बी.के. यांनी आपले उभे आयुष्य कष्टकरी जनतेच्या भल्यासाठी समर्पित केले.कॉ. श्रीपाद अमृत डांगे त्यांच्या मोठेपणाबाबत उद्गार काढताना म्हणतात,''कॉ.डी.बी.कुलकर्णी यांनी केलेल्या कामगारांमधील कार्याचे महत्त्व हे आहे की, त्याआधी व्यक्तीगत स्वरुपात,गटागटाने चालवणाऱ्या ट्रेड युनियनच्या कार्यास त्यांनी व्यापक स्वरुप प्राप्त करुन दिले. त्याला एक क्रांतिकारक आशय दिला.कॉ. डी.एस.वैद्य, खेडगीकर, कॉ. बाबा पुरंदरे, जी.एच. काळे, झुल्मिराम चौधरी या सगळया रेल्वे कामगार नेत्यांना ट्रेड युनियन चळवळीत आणणारे कॉ.डी.बी.के. हे जन्मजात पुढारीच होते.''कॉ. डी.बी.के. यांनी

प्रसिध्दीची कधीही हाव केली नाही.कॉंग्रेसच्या कार्यक्रमाचा प्रसार करतांना वंचितांच्या प्रश्नांवर त्यांनी कॉंग्रेसच्या जेष्ठ नेत्यांशी तात्त्विक मतभेद करण्यातही त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. पक्षासाठी कप्लकाचे आयुष्य जगलेल्या कॉ.डी.बी.के. यांना पुढे कम्युनिस्ट पक्षातील गटबाजीच्या राजकारणाचा फटका बसून पक्षातील पुढाऱ्यांनी त्यांना विजनवासात पाठवून दिले होते.एवढेच नव्हे तर मृत्यूशय्येवर पडलेले असतांना त्यांची स्थानबद्धतेतून सुटका होण्यासाठीचा जामीन उशिराने मिळेल अशी तजवीज करुन भांडवलदार धार्जिण्या सरकारने त्यांच्या जीवनाचा अकाली अंत घडवून आणण्यात मागे पुढे पाहिले नाही.

## संदर्भ सूची


1. कुलकर्णी शांताबाई., 'अपुरी कहाणी -कॉ.डी.बी.कुलकर्णी यांच्या आठवणी', अभिनव प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती जुलै 1976, पृ. क्र. 1,2.
2. तत्रैव, पृ.क्र. 9.
3. तत्रैव, पृ.क्र. 23,24.
4. तत्रैव, पृ.क्र. 25 ते 27.
5. तत्रैव, पृ.क्र. 30.
6. http:// nandinikoza.blogspot.in /2014/05/mulshi-dam-satyagraha-and-womens.html,last seen at 02/09/2016
7. रानडे शांता., 'दोन वादळी व्यक्तिमत्त्वे -डीबीके-शांताबाई कुलकर्णी', प्रकाशक कॉ.गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिल्डिंग,बिंदु चौक, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर 2009 पृ.क्र. 31.
8. कॉ. भालचंद्र कांगो, ''मुलाखत दि.30/01/2016''. सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्ष, भाकप कार्यालय, भुपेश गुप्ता भवन, 85, सयानी रोड, वरळी, मुंबई.
9. रानडे शांता., 'दोन वादळी व्यक्तिमत्त्वे - डीबीके -शांताबाई कुलकर्णी',उपरोक्त, पृ.क्र. 37.
10. उद्धृत, नेहरु जवाहरलाल.,'आत्मकथा', (अनु.) ना.ग.गोरे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती 1988, पृ.क्र.194.
11. कुलकर्णी शांताबाई., 'अपुरी कहाणी -कॉ.डी.बी.कुलकर्णी यांच्या आठवणी', उपरोक्त, पृ.क्र.54 ते 57.
12. तत्रैव, पृ.क्र. 59.
13. चव्हाण शंकर., 'कामगार चळवळ-एक राजकीय विश्लेषण', शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर, पहिली आवृत्ती 2008, पृ.क्र.161.
14. पटवर्धन रा.प., 'सेनापती दादा चौधरी', दादासाहेब चौधरी न्यास समिती प्रकाशन, अहमदनरगर,1977,पृ.क्र.64.
15. रानडे शांता., 'दोन वादळी व्यक्तिमत्त्वे - डीबीके -शांताबाई कुलकर्णी',उपरोक्त, पृ.क्र.49.
16. रानडे वा.दा., 'समाजवादी चळवळीची वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे, 2010, पृ.क्र.84.
17. आवटे लीला., 'एका समर्पिताची जीवनयात्रा-कॉ.एस.व्ही.देशपांडे (मास्तर)', प्रकाशक कॉ.गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिल्डिंग, बिंदु चौक, कोल्हापूर 2010, पृ.क्र.17.
18. लाड श्रीकांत (संपा.)., 'भारतीय कम्युनिस्ट पक्षाची 50 वर्षे', भारतीय कम्युनिस्ट पक्ष प्रकाशन, मुंबई, जानेवारी 1976, पृ.क्र. 46.
19. तत्रैव, पृ.क्र. 47.
20. शेवाळे विठ्ठल., 'पेटलेले दिवस-संगमनेर अकोल्याच्या कम्युनिस्ट पक्षाचा प्रेरक इतिहास', प्रकाशक कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिंल्डिंग, बिंदु चौक, कोल्हापूर, पहिली आवृत्ती 2009, पृ.क्र. 7.
21. लोकयुध्द., 'हिंदुस्तानी कम्युनिस्ट पार्टी का साप्ताहिक पत्र',दि.26/11/1944, पृ.क्र. 2.
22. रजनी पाम दत्त., 'इंडिया टूडे', इंग्रजी (अनु.), य.ना. देवधर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती 2006, पृ.क्र. 571.
23. कुलकर्णी शांताबाई., 'अपुरी कहाणी -कॉ.डी.बी.कुलकर्णी यांच्या आठवणी',उपरोक्त,पृ.क्र.123.

24. उर्ध्वरेषे प्रभाकर., 'माझे हरवलेले दिवस', मौज प्रकाशन मुंबई, 1984,पृ.क्र.215,216.
25. कॉ.भालचंद्र कानगो, ''मुलाखत दि. 30/01/2016'', सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्ष, भाकप कार्यालय, भुपेश गुप्ता भवन, 85, सयानी रोड,वरळी, मुंबई.
26. कुलकर्णी शांताबाई., 'अपुरी कहाणी -कॉ.डी.बी.कुलकर्णी यांच्या आठवणी', उपरोक्त, पृ.क्र.146.
27. चौसाळकर अशोक, 'कॉ. श्रीपाद अमृत डांगे', लोकवांङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती,2011,पृ.क्र.23,24.
28. कॉ. गंगाधर चिटणीस., 'मंजिल अजून दूरच', प्रकाशक कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिल्डिंग, बिंदु चौक, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, 20 मे 2010, पृ.क्र.109,110.
29. भावे सविता.,'कृषिक्रांतीचे सेनानी अण्णासाहेब शिंदे', कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणे, पृ.क्र. 175.
30. लोकयुग., हिंदी कम्युनिस्ट पक्षाचे साप्ताहिक पत्र, दि. 16/05/1948,पृ.क्र.5.